जावक 2182/2021
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेसंट रोड

# परिपत्रक क्रमांक 588/२०२१ दिनांक ०२/०६/२०२१

खालील सही करणार यांच्या असे निर्देशनास आले की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेले न्यास हे त्याचे नामफलक हे मराठी भाषेमध्ये लावत नाही. महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्रमांक- मभावा-२०१९/प्र.क्र.६६/भाषा-२, मंत्रालय मुंबई दि.०६.११.२०२० नुसार मराठी भाषेमध्ये नामफलक लावणे आवश्यक आहे. करिता, राज्यातील सर्व नोंदणीकृत न्यासांचे पदाधिकारी यांना या परिपत्रकान्वये आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या न्यासाचा नामफलक मराठी भाषेमध्ये दर्शनी भागामध्ये लावावा. राज्यातील सर्व धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त/ सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी सदर परिपत्रकानुसार दिलेले निर्देशाचे पालनाबाबत अहवाल सादर करावा.

(प्र.श्रा.तरार)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत —
१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. कार्यालय परिपत्रक धारिणी
५. संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी)
६. कार्यालयीन नोटीस बोर्ड.

मभिसरनोबत/०२.०६.२०२१